# पोलिस शिपाई चालक भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र सहायक पोलिस उपनिरीक्षक चालक, पोलिस हवालदार चालक, पोलिस नाईक चालक व पोलिस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा आणि दिनांक २७.०६.२०२२, दिनांक २३.०९.२०२२ अन्वये सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारित तरतुदींनुसार पोलिस दलातील पोलिस अधीक्षक, सातारा यांचे आस्थापनेवरील पोलिस शिपाई चालक पदांची एकुण ३९ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी देखील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्वीकारण्यात येतील. याबाबत सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलिस अधीक्षक, सातारा यांच्या आस्थापनेवरील पोलिस शिपाई चालक या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करू शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलिस शिपाई चालक या पदांसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या १:१० या प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील.
- **लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकूण ५० गुणांची कौशल्य चाचणी द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.**
- **सर्व पोलिस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- शारीरिक चाचणी व लेखी परीक्षामध्ये प्राप्त केलेल्या एकुण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.**
- पोलिस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरिता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात ( Unreserved) अर्ज करू शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करू शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

सही/-

**(समीर शेख)**

Kolhapur Main
Page No. 7 Mar 01, 2024
Powered by: erelego.com